स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

सत्यमेव जयते

MJPJAY

# महाराष्ट्र शासन
## महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना
## राज्य आरोग्य हमी सोसायटी

जीवनदायी भवन, राज्य कामगार विमा योजना रुग्णालय आवार गणपत जाधव मार्ग,वरळी, मुंबई ४०० ०१८
दुरध्वनी क्रमांक- ०२२- २४९९९२०३/०४/०५, website www.jeevandayee.gov.in

जा.क्र राआहासो/मात/वकाअ/६७४१ /१७२२ /२०२२ दिनांक : ११/११/२०२२.

**संदर्भ:-** जा.क्र राआहासो/मात/वकाअ/६७४१/१६४५/२०२२.
**विषय:-** दोन वर्षाच्या कालावधीसाठी ऑपरेटरसह प्रिंटींग, झेरॉक्स व स्कॅनिग सुविधा पुरवण्याबाबत कागदपत्रे सादरकरण्यासठी देण्यात येणारी मुदत वाढ.......

उपरोक्त संदर्भीयविषयान्वये अनुसरुन सर्व संबधितांना कळविण्यात येते कि राज्य आरोग्य हमी सोसायटी, वरळी कार्यालयात दोन वर्षाच्या कालावधीसाठी ऑपरेटरसह प्रिंटींग, झेरॉक्स व स्कॅनिग सुविधा पुरवण्याकरिता आपले दरपत्रके या कार्यालयास ५ दिवसाच्या आत (दिनांक ११-११-२०२२ ते १५-११-२०२२ या कालवधीत) सोबत जोडण्यात आलेल्या तक्त्यानुसार व पत्रात नमूद केल्यानुसार कागदपत्रे बंद लिफाफामध्ये दरपत्रकासोबत सादर करावे. सोबत कामाचे स्वरूप ( scope of work) देखील जोडण्यात येत आहे.

टीप: GST क्रमांक अनिवार्य

(दिलीप कवठकर )
महाव्यवस्थापक-प्रशासन
राज्य आरोग्य हमी सोसायटी

# दरपत्रकासोबत खालीलप्रमाणे कागदपत्रे लिफाफा मध्ये सादर करणे बंधनकारक राहील.

१) व्यवसाय परवाना किंवा दुकान व संस्था नोंदणी प्रमाणापत्र,

२) मागील तीन वर्षाचे वॅट/जी.एस.टी निपटारा प्रमाणपत्र.

३) पॅनकार्ड

४) कोणत्याही शासकीय/निमशासकीय संस्थेसोबत काम समाधानकारक पणे पुर्ण केले असल्याचा किमान १ वर्षाचा अनुभव दाखला.

५) मागील तीन आर्थिक वर्षाचे आयकर प्रमाणपत्र.

६) प्रिंटर साहित्य नामांकीत निर्माता कंपनीचा अधिकृत विक्रेता असलेबाबतचे प्रमाणपत्र.

७) जी.एस.टि नोंदणी प्रमाणपत्र

८) वार्षिक उलाढाल किमान ५०.०० लक्ष पर्यंत असल्याचे कागदपत्रे.

९) EPF नोंदणी प्रमाणपत्र

१०) पुरवठादाराने दर देण्यात आलेल्या विहित तक्तानुसार सादर करण्यात यावे.

११) पुरवठादारांने दर तक्ता हा जबाबदार व्यक्तिचे नांव आणि त्याची स्वाक्षरी नमूद करून सदर कागद पत्र सादर केली पाहिजे.

१२) कोणतीही दरपत्रके पुर्णपणे किंवा अंशतः स्विकारणे किंवा आलेल्या सर्व दरपत्रके नाकारणे याचा अधिकार राज्य आरोग्य हमी सोसायटीचे आहेत. तसेच कोणतेही कारण न देता दरपत्रके रद्द करण्याच्या अधिकार राज्य आरोग्य हमी सोसायटीने राखून ठेवला आहे.

१३) पुरवठादाराने करारनामा लिहून दिल्यावर राज्य आरोग्य हमी सोसायटीने दिलेल्या आदेशानुसार तात्काळ ठरवून दिलेल्या मुदतीत मालाचा / सेवेचा पुरवठा केला पाहिजे.

१४) राज्य आरोग्य हमी सोसायटीला आवश्यक असलेल्या कमी-अधिक सेवेची मागणी राज्य आरोग्य हमी सोसायटी करेल आणि त्याप्रमाणे पुरवठादाराने सेवेचा पुरवठा करणे आवश्यक आहे.

१५) राज्य आरोग्य हमी सोसायटीने मागणी पत्रात नमूद केलेल्या मुदतीत पुरवठादाराने सेवेचा संपुर्ण पुरवठा करणे आवश्यक आहे. राज्य आरोग्य हमी सोसायटीचे कामकाज सुरळीत चालु राहण्यासाठी सर्विसींगची सेवा महिन्याच्या कोणत्याही दिवशी संबंधित विभागाच्या मागणीनुसार वेळो वेळी तातडीने पुरविणे बंधनकारक राहील, याकरिता कार्यालयीन वेळेत कायम स्वरूपी Support Executive नेमण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

१६) पुरवठादाराने सेवेचा पुरवठा करतांना त्याचे बिलासोबत मालाबाबत चलन व सेवेबाबत दाखला देणे आवश्यक आहे. चलनाशिवाय दिलेला सेवा स्विकारली जाणार नाही व तद्संबधीत तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

१७) राज्य आरोग्य हमी सोसायटीने मागणी केलेला सेवा पुरवठादाराने विहित वेळेत पूर्ण न केल्यास राज्य आरोग्य हमी सोसायटी उपलब्ध असलेल्या इतर कोणत्याही पुरवठादाराकडून सेवा घेईल जर त्यांसाठी जादा होणारा खर्च हा मंजुर दर असलेल्या पुरवठादाराच्या बिलातून किंवा अनामत रक्कमेमधून वसूल करतील तसेच यापुढील आदेश प्राप्त होणेस सदर मंजुर दरपत्रकेधारक सेवेसाठी आपोआप अपात्र होईल.

१८) पुरवठाधारकाने करारनामा केलेल्या तारखेपासून पुढील वर्षाच्या निविदा मंजूर होऊन कार्यवाहीत येईपर्यंत दिलेल्या कामाच्या आदेशानुसार सेवेचा पुरवठा जुन्या मंजुर निविदा दरानुसार करणे बंधनकारक आहे.